Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **M**

# Paper-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .......................................

(Name) ...............................................

2. (Signature) .......................................

(Name) ...............................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ...........................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# DEC - 01313

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# MARATHI

## Paper III

# मराठी

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. ‘हेतुस्थळ’ हा ग्रंथ कोणत्या ग्रंथावर आधारित आहे ?

   (A) ‘स्मृतिस्थळ’

   (B) ‘लीळाचरित्र’

   (C) ‘लक्षणस्थळ’

   (D) ‘श्रीकृष्णचरित्र’

2. पुढीलपैकी कोणता ग्रंथ एकनाथांचा नव्हे ?

   (A) ‘आनंदलहरी’

   (B) ‘चित्सदानंदलहरी’

   (C) ‘चिरंजीवपद’

   (D) ‘स्वात्मसुख’

3. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) ‘गजेंद्रमोक्ष’ | (5) मोरोपंत |
| (2) ‘पांडवप्रताप’ | (6) वामन पंडित |
| (3) ‘सावित्रीगीत’ | (7) मुक्तेश्वर |
| (4) ‘लोपामुद्रा संवाद’ | (8) श्रीधर |
| | (9) रघुनाथ पंडित |

**संकेत :**

   (A) 1–8, 2–9, 3–6, 4–5

   (B) 1–9, 2–8, 3–5, 4–6

   (C) 1–6, 2–5, 3–8, 4–9

   (D) 1–5, 2–6, 3–9, 4–8

4. 'खडकीच्या लढाई' वरील पोवाडा कोणी लिहिला ?

(A) सगनभाऊ

(B) परशुराम

(C) होनाजी

(D) प्रभाकर

5. 'सन्निधवासी शत्रू म्हणजे उदरातील व्याधी' – हे विधान कोणत्या ऐतिहासिक ग्रंथातील आहे ?

(A) होळकरांची थैली

(B) पानिपतची बखर

(C) आज्ञापत्र

(D) श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत

6. काव्यप्रकार व कवी यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) तालचित्रे | (5) र. कृ. जोशी |
| (2) दशपदी | (6) मंगेश पाडगावकर |
| (3) वात्रटिका | (7) अनिल |
| (4) मूर्तकविता | (8) विंदा करंदीकर |
| | (9) वसंत बापट |

**संकेत :**

(A) 1–8, 2–7, 3–6, 4–5

(B) 1–7, 2–8, 3–6, 4–5

(C) 1–8, 2–6, 3–5, 4–7

(D) 1–7, 2–8, 3–5, 4–6

7. पुढीलपैकी कोणते विधान **अचूक** आहे ?

(A) पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणाऱ्या नाटकास 'बुकीश नाटक' म्हणतात.

(B) पुस्तकरूपाने प्रसिद्ध पण ज्याचा एकही प्रयोग होऊ शकला नाही, अशा नाटकास 'बुकीश नाटक' म्हणतात.

(C) ज्या नाटकाच्या संहितेवर विपुल चर्चा होते, त्या नाटकांना 'बुकीश नाटक' म्हणतात.

(D) पुस्तकरूपाने प्रकाशित होऊन रंगभूमीवर ज्याचे प्रयोग होण्यास आरंभ झाला, त्या नाटकास उद्देशून 'बुकीश' ही संज्ञा योजली जाते.

8. 'कळ' या कादंबरीचा लेखक कोण ?

(A) अनंत मनोहर

(B) श्याम मनोहर

(C) मनोहर तल्हार

(D) मनोहर शहाणे

9. कोणत्या नियतकालिकाने कथा-स्पर्धा आयोजित करण्याचा पायंडा पाडला ?

(A) करमणूक

(B) केरळकोकिळ

(C) प्रतिभा

(D) मनोरंजन

10. पुढीलपैकी कोणते पुस्तक ललित लेखन या वर्गात अंतर्भूत होते ?

(A) युगांत

(B) ऋतुचक्र

(C) टिकली एवढं तळं

(D) समाधीवरील अश्रू

11. एकोणिसाव्या शतकात भाषाभाषांमधील कुल-संबंधांच्या संशोधनाला इतकी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती की या प्रकाराच्या संशोधनाला आदर्श मानूनच 'ओरिजिन ऑफ स्पेसीस' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) डार्विन

(B) सोस्यूर

(C) विण्टरनिट्झ

(D) पॉपर

12. पतंजलीने विवेचन केलेली शब्दाची दोन रूपे कोणती ?

(A) अंत:स्तरीयरूप व पृष्ठस्तरीयरूप

(B) व्याकरणिकरूप व भाषिकरूप

(C) ध्वनिरूप व स्फोटरूप

(D) मुक्तरूप व बद्धरूप

13. वाक्यविचारात 'प्रथमोपस्थित घटक' ही संकल्पना कोणी मांडली ?

(A) ब्लूमफील्ड

(B) याकोब्सन

(C) हॉकिट

(D) बोलिंजर

14. 'सूर्य <u>डोंगराआड</u> गेला', 'रामाने <u>पुस्तकावर</u> नाव घातले', या वाक्यांमध्ये 'डोंगरा आड' व 'पुस्तकावर' ही रूपे कोणत्या प्रकारची पूरके होत ?

(A) कर्मपूरके

(B) आधारपूरके

(C) उभयान्वयी अव्यय

(D) विधिपूरके

15. शब्द आणि भाषा यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) अजब | (5) फार्शी |
| (2) अजिबात | (6) पोर्तुगीज |
| (3) तुरुंग | (7) अरबी |
| (4) काडतूस | (8) फ्रेंच |
| | (9) इंग्लिश |

**संकेत :**

(A) 1–7, 2–5, 3–6, 4–8

(B) 1–6, 2–7, 3–8, 4–5

(C) 1–7, 2–5, 3–8, 4–9

(D) 1–6, 2–7, 3–5, 4–8

16. 'सुपरिंटेंडेंट' > 'सुप्रिटेंड'; 'लायब्ररी' > 'लायब्री'; 'वाद्ययंत्र' > 'वाजंत्री' या उदाहरणांतील स्वनांच्या विलयनाने होणाऱ्या स्वनपरिवर्तनास काय म्हणतात ?

(A) स्वनव्यत्यास

(B) विसदृशीकरण

(C) सदृशीकरण

(D) सदृशस्वनलोप

17. 'कावकाव', 'लाललाल', 'लखलख', 'पटापट' हे शब्द पुढीलपैकी कोणत्या प्रकारचे आहेत ?

(A) अन्यपदप्रधान

(B) समाहारबोधक

(C) समुच्चयबोधक

(D) पूर्णाभ्यस्त

18. भाषाकुलातील जननसंबंध शोधत आपण जसजसे मागे जाऊ तसतशी भाषांची वा भाषाकुलांची संख्या कमी होत गेली पाहिजे; परंतु तशी काही परिस्थिती होती असे म्हणता येणार **नाही**.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान बरोबर

19. पुढीलपैकी कोणता शब्द वऱ्हाडी बोलीतील **नाही** ?

(A) कुरवू

(B) अर्बट

(C) उजागरी

(D) बासन

20. शब्द व शब्दप्रकार यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) गाय व धेनू | (5) अनेकार्थी शब्द |
| (2) स्त्री व पुरुष | (6) अर्थसमावेशक शब्द |
| (3) गोटा | (7) पर्यायवाचक शब्द |
| (4) बाई | (8) विरुद्धार्थी शब्द |
| | (9) गुणव्यंजक शब्द |

**संकेत :**

(A) 1–7, 2–6, 3–5, 4–8

(B) 1–7, 2–6, 3–9, 4–8

(C) 1–7, 2–8, 3–5, 4–6

(D) 1–7, 2–8, 3–9, 4–5

21. भामहाच्या ग्रंथाचे नाव काय ?

(A) 'काव्यालंकारसूत्र'

(B) 'काव्यालंकार'

(C) 'काव्यादर्श'

(D) 'ध्वन्यालोक'

22. संकल्पना आणि साहित्यमीमांसक यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) संवादी भ्रम | (5) भट्टनायक |
| (2) भोग | (6) भामह |
| (3) साधारणीकरण | (7) वामन |
| (4) रीती | (8) शंकुक |
| | (9) अभिनवगुप्त |

**संकेत :**

(A) 1−8, 2−5, 3−7, 4−9

(B) 1−8, 2−5, 3−9, 4−7

(C) 1−8, 2−6, 3−7, 4−9

(D) 1−8, 2−9, 3−6, 4−7

23. 'अपूर्ववस्तु निर्माणक्षमाप्रज्ञा' ही प्रतिभेची व्याख्या कोणी केली ?

(A) आनंदवर्धन

(B) राजशेखर

(C) अभिनवगुप्त

(D) जगन्नाथ

24. 'रसा'च्या संदर्भात अनुकरणाची कल्पना कोणी मांडली ?

(A) अभिनवगुप्त

(B) शंकुक

(C) भट्टतौत

(D) भट्टलोल्लट

25. 'ध्वनिमता'चे खंडन करणारा टीकाकार कोण ?

(A) भामह

(B) दण्डी

(C) महिमभट्ट

(D) राजशेखर

26. मराठीमध्ये 'मुक्त प्रतिभा' आणि 'बद्ध प्रतिभा' असा भेद कोणी केला आहे ?

(A) दि. के. बेडेकर

(B) सुरेन्द्र बारलिंगे

(C) रा. भा. पाटणकर

(D) प्रभाकर पाध्ये

27. 'अनुकृती'ची संकल्पना कोणी मांडली ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) प्लेटो

(C) होरेस

(D) सिडनी

28. पुढील संकल्पना व समीक्षक यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) कलात्मक विकल्पन | (5) वा.म. जोशी |
| (2) भावगंध | (6) म.सु. पाटील |
| (3) कारणानां अनेकता | (7) मा.गो. देशमुख |
| (4) पोत | (8) द.ग. गोडसे |
| | (9) दि.के. बेडेकर |

**संकेत :**

(A) 1–9, 2–7, 3–5, 4–8

(B) 1–7, 2–9, 3–5, 4–8

(C) 1–7, 2–5, 3–6, 4–8

(D) 1–9, 2–5, 3–6, 4–8

29. भाषेचा 'निर्देशात्मक' व 'भावनात्मक' उपयोग हा भेद कोणी केला ?

(A) नोम चॉम्स्की

(B) फेर्दिनां द सोस्यूर

(C) आय.ए. रिचर्डस्

(D) रोमान याकबसन

30. समीक्षा दृष्टिकोण आणि मीमांसक यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | समाजशास्त्रीय समीक्षा | (5) | सिग्मण्ड फ्रॉइड |
| (2) | मानसशास्त्रीय समीक्षा | (6) | कार्ल मार्क्स |
| (3) | आदिबंधात्मक समीक्षा | (7) | एलन शोवॉल्टर |
| (4) | स्त्रीवादी समीक्षा | (8) | सी.जी. युंग |
| | | (9) | ऑस्टिन वॉरन |

**संकेत :**

(A) 1–6, 2–5, 3–8, 4–7

(B) 1–6, 2–5, 3–7, 4–9

(C) 1–6, 2–5, 3–7, 4–8

(D) 1–6, 2–5, 3–9, 4–8

31. 'करार' ही संकल्पना ज्या 'नेरेटिव्ह कण्टेण्ट' संज्ञेवर आधारित आहे, त्याचा मूळ उद्‌गाता कोण ?

(A) आर. जे. कॉलिंगवूड

(B) इम्यॅन्युएल काण्ट

(C) जोनाथन कलर

(D) बेनेदेत्तो क्रोचे

32. साहित्यातील निवेदनात वापरल्या जाणाऱ्या काळाच्या आधारे साहित्याचे वर्गीकरण कोणी केले आहे ?

(A) टी.एस. एलियट

(B) नॉर्थ्रोप फ्राय

(C) सुझन लँगर

(D) रेने वेलेक

33. स्तवनोत्सव स्वीकार आणि अतीतत्व हे सुखात्मिकेची पृथगात्मता व्यक्त करणारे पैलू आहेत, हा सिद्धान्त कोणी मांडला ?

(A) रॉबर्ट हॉलंडेर

(B) जोसेफ कॅम्पबेल

(C) ॲरिस्टॉटल

(D) प्लेटो

34. "सुखात्मिकेतील व्यक्तिरेखा या व्यक्ती म्हणून न जाणवता एखाद्या वर्गाच्या प्रतिनिधी म्हणून जाणवतात आणि त्या भावनिकतेपेक्षा बौद्धिकतेला आवाहन करणाऱ्या असतात."

(A) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

35. कवी दासोपंतांच्या साहित्यावर कोणत्या संप्रदायाचा प्रभाव होता ?

(A) महानुभाव

(B) दत्त

(C) समर्थ

(D) वारकरी

36. विठ्ठलशरणता असूनही जातीच्या संदर्भात बंडखोर असलेला कवी कोण ?

(A) एकनाथ

(B) कर्ममेळा

(C) विसोबा खेचर

(D) नामदेव

37. 'स्त्री-मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा' या पंचखंडात्मक प्रकल्पाच्या संयोजक कोण ?

(A) विधुत भागवत

(B) भालचंद्र फडके

(C) य. दि. फडके

(D) सुमा चिटणीस

38. पुढील व्याख्या कोणाची ?

"संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत (जीवनपद्धती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती."

(A) इरावती कर्वे

(B) दुर्गा भागवत

(C) ह. श्री. शेणोलीकर

(D) गो. म. कुलकर्णी

39. "'समाजलक्ष्यी अभ्यासा'त समाजविषयक विवेचन हे केन्द्रस्थानी असते, व साहित्यविषयक आकलनास गौण स्वरूप लाभते."

(A) या विधानाच्या पूर्वार्ध बरोबर आहे.

(B) या विधानाच्या उत्तरार्ध बरोबर आहे.

(C) संपूर्ण विधान बरोबर आहे.

(D) संपूर्ण विधान चुकीचे आहे.

40. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या साहित्यकृतींत कोकणातील सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब उमटते म्हणून त्याला ग्रामीण साहित्य म्हटले जाते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

41. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर विशेष भर देणारा वाद कोणता ?

(A) अभिजातवाद

(B) रोमँटिसिझम

(C) वास्तववाद

(D) आधुनिकवाद

42. पुढीलपैकी कोणत्या विचारवंताने अर्थशास्त्र-विषयक लेखनही केले आहे ?

(A) लोकहितवादी

(B) महात्मा फुले

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) धनुर्धारी

43. पुढीलपैकी कोणती लेखनकृती स्वातंत्र्यवीर सावरकरांची नव्हे ?

(A) माझी जन्मठेप

(B) संन्यस्त खड्ग

(C) कमला

(D) मर्दानी झांशीवाली

44. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातून मांडलेली वैचारिक भूमिका महत्त्वाची असून ती अजूनही कालबाह्य झालेली **नाही**.

(A) या विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे.

(B) या विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे.

(C) संपूर्ण विधान बरोबर आहे.

(D) संपूर्ण विधान चूक आहे.

45. पुढीलपैकी कोणते नियतकालिक साहित्यसंस्थेतर्फे चालविले जात **नाही** ?

(A) प्रतिष्ठान

(B) महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(C) युगवाणी

(D) अनुष्टुभ्

46. पुढीलपैकी कोणते नियतकालिक महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध होते ?

(A) कवितारती

(B) पंचधारा

(C) प्रतिष्ठान

(D) युगवाणी

47. 'अभिरुची' या नियतकालिकाचे संपादक कोण ?

(A) राम पटवर्धन

(B) पुरुषोत्तम पाटील

(C) पुरुषोत्तम आत्माराम चित्रे

(D) चंद्रकांत खोत

48. संपादक व नियतकालिके यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) का. र. मित्र | (5) 'मनोरंजन' |
| (2) ह. वि. मोटे | (6) 'छंद' |
| (3) पुरुषोत्तम पाटील | (7) 'प्रतिभा' |
| (4) पु. शि. रेगे | (8) 'सत्यकथा' |
| | (9) 'कवितारती' |

**संकेत :**

(A) 1–5, 2–7, 3–9, 4–6

(B) 1–7, 2–5, 3–6, 4–9

(C) 1–5, 2–6, 3–9, 4–7

(D) 1–7, 2–6, 3–9, 4–8

49. युद्धजन्य परिस्थितीवर आधारित मराठी कादंबरी कोणती ?

(A) कोसला

(B) धग

(C) सूड

(D) रणांगण

50. बाबुराव बागूल यांच्या कथेतील विद्रोह विशेषत्वाने कोणत्या व्यवस्थेविरुद्ध आहे ?

(A) राष्ट्रीय पारतंत्र्य

(B) सेन्सॉर

(C) पुरुषप्रधान संस्कृती

(D) जातिभेद

51. 'लोकसाहित्य हे जनतेच्या सूचनात्मक शक्तीचे सुंदर प्रतीक आहे.' हे मत कोणी मांडले ?

(A) मॅक्सीम गॉर्की

(B) गास्टर

(C) हार्मोन

(D) स्पिनोझा

52. सूर्यकथेचा सिद्धांत (सोलर थिअरी) कोणी मांडला ?

(A) एडवर्ड टायलर

(B) फ्रेझर

(C) आर. आर. मेरट

(D) मॅक्सम्युलर

53. ना. गो. नांदापूरकर यांनी संकलित केलेल्या रामसीताविषयक ओव्यांचे संपादन कोणी केले ?

(A) उषा देशमुख

(B) सरोजिनी वैद्य

(C) उषा जोशी

(D) सरोजिनी बाबर

54. अश्लीलतेचा आरोप करून शासनाने तमाशावर कोणत्या साली बंदी घातली ?

(A) 1955

(B) 1958

(C) 1948

(D) 1949

55. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) एक होता राजा | (5) डॉ. प्रभाकर मांडे |
| (2) गावगाड्या बाहेर | (6) नामदेव व्हटकर |
| (3) मराठीतमाशा : कला व साहित्य | (7) रा. चिं. ढेरे |
| | (8) दुर्गा भागवत |
| (4) धर्म व लोकसाहित्य | (9) डॉ. सरोजिनी बाबर |

**संकेत :**

(A) 1—9, 2—5, 3—6, 4—8

(B) 1—5, 2—9, 3—8, 4—6

(C) 1—8, 2—6, 3—5, 4—9

(D) 1—5, 2—7, 3—6, 4—9

56. विश्वसाहित्य ही संकल्पना सर्वात प्रथम कोणी मांडली ?

(A) रवीन्द्रनाथ टागोर

(B) मॅकन

(C) मॅथ्यू अर्नोल्ड

(D) गटे

57. आपल्या स्वत:च्या साहित्याचा अभ्यास करतानाही आपण तौलनिक अभ्यासक असतो, असे कोणी म्हटले आहे ?

(A) भालचंद्र नेमाडे

(B) अमीया देव

(C) मीनाक्षी मुखर्जी

(D) चंद्रशेखर जहागिरदार

58. भाषांतरात दोन संरचनांचा परस्परसंयोग आणि समन्वय होत असतो, हे मत कोणाचे आहे ?

(A) जेरी लेव्ही

(B) अंतोन पायोविक

(C) अमीया देव

(D) दिलीप चित्रे

59. विजय तेंडुलकरांनी अनुवादित केलेल्या 'वासनाचक्र'चे मूळ लेखक कोण ?

(A) युजीन ओनील

(B) ज्यां आनुई

(C) टेनेसी विल्यम्स

(D) इब्सेन

60. पुढील कादंबऱ्या व अनुवादक यांच्या जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) कण्णाडि | (5) द. रा. बेन्द्रे |
| (2) शांतला | (6) श्रीपाद जोशी |
| (3) बंद दरवाजा | (7) इंदुमती केळकर |
| (4) शतघ्नी | (8) प्रतिभा रानडे |
| | (9) माधव कानिटकर |

**संकेत :**

(A) 1–9, 2–5, 3–8, 4–7

(B) 1–5, 2–7, 3–9, 4–6

(C) 1–9, 2–7, 3–6, 4–5

(D) 1–7, 2–9, 3–5, 4–8

61. स्त्रीवादाच्या संदर्भात पहिल्या जगातील स्त्रिया व तिसऱ्या जगातील स्त्रिया यांत फार मोठा फरक असल्याचे कोणी नमूद केले ?

(A) अमीया देव

(B) गायत्री चक्रवर्ती स्पीवॉक

(C) मीनाक्षी मुखर्जी

(D) शोभा नाईक

62. दडपणुकीतून मुक्ती मिळविण्यासाठी नवी स्त्रीकेंद्री भाषिक रचना करण्यावर अधिक भर कोणी दिला ?

(A) हेलन सिझू

(B) सूझन गुबर

(C) हेरॉल्ड ब्लूम

(D) सॅण्ड्रा गिल्बर्ट

63. 'वन इज नॉट – बॉर्न ए वुमन रादर वन बिकम्स वुमन' हे विधान कोणाचे आहे ?

(A) केट मिलेट

(B) सिमान द बोवॉ

(C) जॉन शॉर्वेट

(D) गेल येट्स

64. 'बाबांचा संसार माझा कसा होणार ?' हा प्रश्न कोणी विचारला ?

(A) इरावती कर्वे

(B) विभावरी शिरूरकर

(C) लक्ष्मीबाई टिळक

(D) रमाबाई रानडे

65. काव्यसंग्रह आणि कवयित्री यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) संसार | (5) नीरजा |
| (2) वेणा | (6) पद्मा |
| (3) नीहार | (7) मलिका अमरशेख |
| (4) वाळूचा प्रियकर | (8) संजीवनी मराठे |
| | (9) अरुणा ढेरे |

**संकेत :**

(A) 1–8, 2–5, 3–6, 4–7

(B) 1–7, 2–6, 3–9, 4–5

(C) 1–9, 2–8, 3–7, 4–6

(D) 1–5, 2–9, 3–8, 4–6

66. कथाकार आणि कथासंग्रह यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) भास्कर चंदनशिव | (5) रक्त आणि पाऊस |
| (2) बाबा पाटील | (6) अंगारमाती |
| (3) नागनाथ कोत्तापल्ले | (7) वाट ही चालावी |
| (4) श्रीराम गुंदेकर | (8) उचल |
| | (9) काशीयात्रा |

**संकेत :**

(A) 1–6, 2–7, 3–5, 4–8

(B) 1–7, 2–6, 3–5, 4–8

(C) 1–7, 2–5, 3–6, 4–8

(D) 1–6, 2–5, 3–9, 4–8

67. मराठी ग्रामीण कथेची प्रबंधस्वरूपी चिकित्सा कोणी केली आहे ?

(A) गो. म. कुलकर्णी

(B) वासुदेव मुलाटे

(C) इंद्रजित भालेराव

(D) अ. वा. कुळकर्णी

68. पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील हा पुढीलपैकी कोणत्या कादंबरीतील निवेदक आहे ?

(A) झाडाझडती

(B) कोयता

(C) गणगोत

(D) मेड इन इंडिया

69. 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' हा समीक्षाग्रंथ कोणाचा ?

(A) आनंद यादव

(B) कैलास सार्वेकर

(C) विठ्ठल वाघ

(D) नारायण सुमंत

70. पुढीलपैकी कोणती साहित्यकृती व्यंकटेश माडगूळकर यांची **नाही** ?

(A) 'बनगरवाडी'

(B) 'वावटळ'

(C) सरवा

(D) एल्गार

71. 'रक्ताळलेली लक्तरे' हा कथासंग्रह कोणाचा ?

(A) उत्तम कांबळे

(B) सुधाकर भालेराव

(C) योगेन्द्र मेश्राम

(D) केशव मेश्राम

72. राम बसाखेत्रे यांच्या आत्मकथनाचे शीर्षक कोणते ?

(A) मातीचे आकाश

(B) टाकीचे घाव

(C) आभरान

(D) घराणं तमासगिराचं

73. 'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविला नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
अन् जागा केलास उभा बहिष्कृत भारत'
– वरील काव्यपंक्ती कोणत्या कवीच्या ?

(A) वामन निंबाळकर

(B) ज. वि. पवार

(C) दया पवार

(D) केशव मेश्राम

74. 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथाचा लेखक कोण ?

(A) यशवंत मनोहर

(B) नरेन्द्र जाधव

(C) रावसाहेब कसबे

(D) शरद पाटील

75. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतापासून योग्य उत्तर निवडा :

| | |
|---|---|
| (1) जातीला जात वैरी | (5) ना. स. झोडगे |
| (2) फांजर | (6) रुस्तुम अचलखांब |
| (3) वस्ती | (7) आत्माराम राठोड |
| (4) तांडा | (8) वसंत मून |
| | (9) ना. म. शिंदे |

**संकेत :**

(A) 1–5, 2–9, 3–6, 4–7

(B) 1–7, 2–5, 3–8, 4–9

(C) 1–6, 2–8, 3–5, 4–7

(D) 1–9, 2–5, 3–8, 4–7

**ROUGH WORK**

## ROUGH WORK